# शासकीय तंत्रनिकेतन

## छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था ) स्टेशन रोड उस्मानपुरा छत्रपती संभाजीनगर431005
दुरध्वनी कार्यालय 2334724, 2353644Website: www.gpabad.ac.in
EmailID:principal.gpaurangabad@dtemaharashtra.gov.in

जाक्रशातंनिछसं/ग्रंथालय/निविदा/२०२३-२४/4328 दिनांक: 16 OCT 2023

प्रति,

-----------------------

-----------------------

विषय: संस्थेच्या ग्रंथालयासाठी २०२३-२४ मध्ये पुस्तके खरेदी करण्याकरिता निविदा पाठविणे बाबत.

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, सन २०२३-२४ या वर्षासाठी या संस्थेस स्थापत्य, यंत्र, विद्युत, अणुविद्युत, ऑटोमोबाईल, माहिती तंत्रज्ञान, संगणक, ड्रेस डिझायनिंग व आरटीफिशियल इंटेलिजंस पदविका इत्यादी शाखेसंबंधी पुस्तके खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता आपणाकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी आपण खाली दर्शविलेल्या अटिंची पूर्तता करून आपली निविदा दिनांक १6 नोव्हेंबर २०२३ सायकाळी ०५.०० पर्यंत किंवा त्यापूर्वी या संस्थेत पोहचतील अशा बेताने पाठवावी. सदर निविदा ३१ मार्च २०२४ पर्यंत लागू (valid) राहतील.

अटी व शर्ती

०१. मोहोरबंद निविदा पाठविण्यात आलेल्या पाकिटावर वरच्या बाजूस " सन २०२३-२४ साठी पुस्तके पुरविण्यासाठी निविदा " असे स्पष्ट लिहिलेले असावे.

०२.सर्व भारतीय प्रकाशनासाठी एकत्रित व परदेशी प्रकाशनासाठी एकत्रीत किती टक्के सूट(Discount) देवू शकाल ते स्पष्टपणे आपल्या निविदेमध्ये नमूद करावे.

०३.GST लागू असल्यास त्याचा क्रमांक आपण आपल्या निविदेमध्ये नमूद करावा.

०४.पुरवठाधारकास पुस्तके स्वखर्चाने संस्थेत पाठवावी लागतील.

०५.आपले पेमेंट RTGS/NEFT द्वारे करण्यात येईल.

०६. संस्थेने मागणी केलेल्या पुस्तकांचा पुरवठा २५ दिवसामध्ये करणे आवश्यक आहे.

०७.मुदतीनंतर निविदा मिळाल्यास ती विचारात घेतली जाणार नाही,याची नोंद घ्यावी.

०८.कोणतीही निविदा मान्य करणे अथवा नाकारण्याचे सर्व अधिकार निम्नस्वाक्षरीकाराकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन
छत्रपती संभाजीनगर

प्रत:०१.सूचना फलक कार्यालय
०२. सूचना फलक ग्रंथालय
०३. संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी

Scanned with CamScanner